# श्‍री देवीची आरती/अश्विन शुद्ध शुक्लपक्षी



**Exported from Wikisource on १२ ऑक्टोबर, २०२१**

अश्विन शुद्ध शुक्लपक्षी अंबा बैसली सिंहासनी हो ।
प्रतिपदेपासूनी घटस्थापना ती करुनी हो
मूलमंत्र जप करुनी भोंवते रक्षक ठेवूनी हो । ब्रह्माविष्णू रुद्र आईचे करीती पूजन् हो ॥१ ॥

उदो बोला उदो बोला अंबाबाई माऊलीचा हो । उदोकारे गर्जती काय महिमा वर्णू तिचा हो ॥धृ ॥

द्वितीयेचे दिवशी मिळती चौसष्ट योगीनी हो । सकळामध्ये श्रेष्ठ परशुरामाची जननी हो
कस्तुरी मळवट भांगी शेंदूर भरुनी हो । उदोकारे गर्जती सकल चामुंडा मिळोनी हो ॥२ ॥

तृतीयेचे दिवशी अंबे शृंगार मांडीला हो । मळवट, पातळ-चोळी कंठी हार मुक्ताफळा हो
कंठीची पदके कासे पितांबर पिवळा हो । अष्टभुजा मिरविती अंबे सुंदर दिसे लीला हो ॥३ ॥

चतुर्थीचे दिवशी विश्वव्यापक जननी हो । उपासका पहासी प्रसन्न अंत:करणी हो
पूर्णकृपे पहासी जगन्माते मनमोहिनी हो । भक्तांच्या माऊली सूर ते येती लोटांगणी हो ॥४ ॥

पंचमीचे दिवशी व्रत ते उपांगललिता हो । आर्धपाद्य पुजनें तुजला भवानीस्तविती हो
रात्रीचे समई करिती जागरण हरि कथा हो । आनंदे प्रेम ते आले सद्भावे क्रिडता हो ॥५ ॥

षष्टीचे दिवशी भक्त आनंद वर्तला हो । घेवुनी दिवटया हाती हर्षे गोंधळ घातला हो
कवडी एक अर्पिता देशी हार मुक्ताफळा हो । जोगवा मागता प्रसन्न झाली मुक्ताफळा हो ॥६ ॥

सप्तमीचे दिवशी सप्तशृंग गडावरी हो । तेथे तू नांदसी भोवती पुष्पे नानापरी हो
शेवंती जाईजुई पूजा रेखीयली बरवी हो । भक्त संकटी पडता झेलुनी घेसी वरचे वरी हो ॥७ ॥

अष्टमीचे दिवशी अष्टभुजा नारायणी हो । संह्याद्री पर्वती उभी पाहिली जगत्जननी हो
मन माझे मोहिले शरण आलो तुज लागुनी हो । स्तनपान देऊनी सुखी केले अंत:करणी हो ॥८ ॥

नवमीचे दिवशी नवदिवसांचे पारणे हो । सप्तशती जप होम हवने सद्भक्ती करुनी हो
षड्रस अन्ने नैवेद्याशी अर्पियली भोजनी हो । आचार्य ब्राह्मणा तृप्त त्वा केले कृपे करुनी हो ॥९ ॥

दशमीचे दिवशी अंबा निघे सीमोल्लंघनी हो । सिंव्हारुढ संबळ शस्त्रे अंबे त्वा लेवुनी हो
शुंभनिशूंभादिक राक्षसा किती मारिसी रणी हो । विप्ररामदासा आश्रय दिधला चरणी हो ॥१० ॥